


# ।। इरादो में दम है तो मंजिले भी झुका करती है।।

## जबरदस्त,जिंदाबाद ,रोमहर्षक असा आगळा वेगळा वर्धापन सोहळा

### राजकीय ,सामाजिक क्षेत्रातील नामवंत मान्यवरांसह संपादक, डॉक्टर,वकील,पत्रकार, शिक्षकांची विशेष उपस्थिती






Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# संपादक मोहम्मद अबुबकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## वर्धापन कार्यक्रमाला, सामाजिक सांस्कृतिक जोड दिल्याने उपस्थित मंत्रमुग्ध







बीड । दिव्य वार्ता

**सायं दैनिक दिव्यवार्ता साप्ताहिक कशमकश वर्तमान पत्राचा १४ वा वर्धापन सोहळा शहरातील कोहिनूर लॉन या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला राजकीय पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह धर्म गुरूंची विशेष उपस्थिती होती सर्व वाचक जाहिरातदार आणि प्रेम करणाऱ्या तमाम जनतेच्या उपस्थिती हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती या कार्यक्रमाची शोभा वाढवत होती.**

शहरातील तेलगाव रोड स्थित कोहिनूर लॉन्स येथे अतिशय भव्य दिव्य स्वरूपात हा वर्धापन सोहळा आयोजित करण्यात आला होता.सायं.५ वा कार्यक्रमाला सुरवात झाली. आपल्या प्रास्तविक भाषणात संपादक मोहम्मद अबूबकर यांनी आपल्या चौदा वर्षांच्या वर्तमान पत्र क्षेत्रातील आढावा उपस्थितांच्या लक्षात आणून दिला.हित पर्यंत चा खडतर प्रवास उपस्थित तुमच्या सर्वांच्या सहकार्याने कसा सुकर झाला याचा पाढा त्यांनी वाचक तसेच कार्यक्रमाला उपस्थित सर्व वाचक, शुभचिंतक व आ.इद्रिस नायकवाडी यांच्या समोर वाचला समीर काझी यांच्या कडे बीड येथील उर्दू घराचा प्रश्न उपस्थित केला ,वर्धापन दिनाच्या निमित्ताने संपादक मोहम्मद अबूबकर यांना शुभेच्छा देण्यासाठी सर्वच क्षेत्रातील नामवंत लोकांची रेलचेल सुरू होती.ती रात्री १२ वाजेपर्यंत, कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मौलाना शफीक कासमी ( खतीब ए ईमाम मिल्ट्री मस्जिद अहमद नगर ) हे लाभले होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार इद्रिस नायकवाडी ( विधान परिषद सदस्य), समीर काझी अध्यक्ष वक्फ बोर्ड महाराष्ट्र ,हाफिज जाकिर सिद्दिकी ( जिल्हाध्यक्ष जमियत ऊलेमा बीड ) मुफ्ती अब्दुल्ला

### सामाजिक भान जपत सांस्कृतिक दृष्ट्या प्रगल्भ असा वेगळा वर्धापन-मोहम्मद अबूबकर

गेल्या चौदा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्य करत असताना नेहमीच समाजाच्या शेवटच्या घटकांचा विचार आपण केला मनात प्रेम डोक्यात ज्ञान आणि स्वतःच्या मनगटावर विश्वास असेल तर जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही याच प्रकारे साप्ताहिक कशमकश व दिव्यवार्ता ने आपल्या लेखणीतून सिद्ध केलंय वर्धापन सोहळ्याला आज उपस्थित सर्वांच्या सहकार्याने हे शक्य झाले गेल्या चौदा वर्षात वर्तमान पत्र चालवत असताना समाजाच्या गरजू लोकांना आपल्या वर्तमान पत्राच्या माध्यमांतून छोटीशी मदत करता यावी याच साठी आगळ्या वेगळ्या पद्धतीने गरजू महिलांना शिलाई मशिन वाटप करत असताना




### दिव्य वार्ताचा आदर्श वर्धापन सोहळा-संतोष मानुरकर

या वर्धापन दीन कार्यक्रमाला उपस्थित बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मनुरकर यांनी संपादक मोहम्मद अबुबकर यांचे अभिनंदन केले तसेच या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रदान करण्यात येत असलेल्या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले पुढे बोलताना मानुरकर म्हणाले सलग चौदा वर्ष एखाद वर्तमान पत्र चालवत असताना वर्धापन सोहळा अशा आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करणे सोपी गोष्ट नाही हा वर्धापन एक आदर्श सोहळा आहे मोहंमद अबुबकर हे माझ्या नजरेतील पहिलेच पत्रकार आहेत जे या निमित्ताने गरजू लोकांना मदत आणि समाजासाठी कार्य करणाऱ्यांना पुरस्कार प्रदान करतात ,महिलांना शिलाई मशिन आणि विद्यार्थ्यांना सायकल वाटप हा उपक्रम स्तुत्य आहे यावेळी मनुरकर यांनी संपादक मोहम्मद अबुबकर यांच्या कार्याचे भरभरून कौतुक केले आपल्या प्रास्तविक भाषणात मोहम्मद अबुबकर यांनी आजही स्वतःसाठी काही न मागता समाजाच्या गरजेचं उर्दू घरचा प्रश्न मांडला व मान्यवर आमदार इद्रीस नाईकवाडी यांनी त्या संदर्भात तोडगा काढण्याचे वचन दिले ही त्यांची सामाजिक बांधिलकी आहे पुन्हा एकदा संपादक मोहम्मद अबुबकर यांना शुभेच्छा देतो असे ते म्हणाले

### वर्तमान पत्राचा वर्धापन सोहळा क्वचितच नेत्रदीपक होतो - संपादक विजयराज बंब

आजच्या काळात एक वर्तमान पत्र चालवणं म्हणजे अवघड काम झाल आहे संपादक मोहम्मद अबुबकर हे एक नव्हे तर दोन म्हणजेच दिव्य वार्ता आणि कश्मकश हे वर्तमान पत्र चालवत आहेत आणि त्यात ही वर्धापन सोहळा असा नेत्रदीपक साजरा होतोय हे अभिमानास्पद आहे वर्धापन दीन म्हणटल की सत्कार हार तुरे स्वीकारली जातात मात्र घेण्यासाठी नव्हे तर योग्य कार्य करणाऱ्या लोकांसाठी मोहम्मद अबुबकर वर्धापन साजरा करतात यात पुरस्कार वाटप,त्यांचा सन्मान सत्कार करून ते सामाजिक बांधिलकी जपत असतात गेली चौदा वर्ष हे विधायक कार्य असेच सुरू आहे त्यांना पुढील वाटचालीस ही शुभेछा....

### पत्रकारितेला मोठा इतिहास अबू बकर यांनी विश्वास जपला - मुफ्ती अब्दुल्लाह कास्मी

देशाच्या आणि महाराष्ट्रच्या पत्रकारितेला मोठा इतिहास आहे देशाचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम , राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी पत्रकरितेच्या माध्यमातून एक चळवळ उभी केली आणि देशासाठी विधायक कार्य केले हा मोठा इतिहास पत्रकारितेचा आहे याच इतिहासाला डोळ्यासमोर ठेवत कशमकश आणि दिव्य वार्ता चे संपादक पत्रकारितेच्या माध्यमातून विश्वास जपत आहेत त्यांना या सत्कर्यासाठी शुभेच्छा असे ते म्हणाले.......

### वर्धापन दिन हा सत्कार शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस मात्र अबुबकर सत्कार आणि शुभेच्छा देतात-आ. इद्रिस नाईकवाडी

आजचा दिवस मौलाना अबुल कलाम यांचा स्मृती दिवस आहे आझाद देशाचे पहिले शिक्षण मंत्री होते आणि त्यांचे कार्य आपल्या सह देशाच्या नागरिकांसाठी स्मरणीय आहे त्यांच्या स्मृती दिनाच्या निमित्ताने आज सायंकाळ दैनिक दिव्य वार्ता आणि कश मकश या वर्तमान पत्राचा वर्धापन सोहळा सामाजिक उपक्रम राबवत साजरा होतोय हे अभिनंदनीय आहे आज मला या कार्यक्रमाला बोलावत संपादक मोहम्मद अबुबकर यांनी बीड साठी आवश्यक आणि गरजेचं उर्दू घरचा प्रश्न उपस्थित केला त्यांच्या या मागणीची नक्कीच दखल घेवू बीडचा आणि उर्दूचा संबंध दृढ आहे नक्कीच या बाबत लक्ष घालू वर्धापन सोहळा हा शुभेच्छा सत्कार स्वीकारण्यासाठी असतो मात्र असे न करता सामाजिक उपक्रम राबवत संपादक मोहम्मद अबूबकर लोकांना सत्कार पुरस्कार देवून गरजू लोकांना मदत देवून याला चौदा वर्षापासून वेगळ्या प्रकारे साजरा करत आहेत हे वेगळे आश्चर्य आहे हा वर्धापन सोहळा वेगळ्या उंचीचा आहे यात समाजातील लोकांचा विचार होतो म्हणून समाजाला समर्पित असा वर्धापन दिवस आहे असे मी समजतो असे आमदार ईद्रिस नाईकवाडी आपल्या मनोगतात म्हणाले.....



















# संपादक मोहम्मद अबुबकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

ए हिंद बीड ) हे होते वर्धापन दीन सोहळ्याला सांस्कृतिक जोड देत असताना संपादक मोहम्मद अबुबकर यांनी देशातील नामवंत कलाकारांना या कार्यक्रमाला आवर्जून आमंत्रित केले होते यात देशात आणि परदेशात ज्यांच्या शायरीचा डंका वाजतो असे ख्यातनाम शायर आरिफ सैफि यांनी जोरदार शेरो शायरी सादर करत उपस्थितांची मने जिंकली तसेच हास्य कलाकार मुजावर मालेगावी यांनी उपस्थितांना खळखळून हसायला भाग पाडले दुसरे हास्य कलाकार आसिफ अलबेला शायर चिराग शर्मा ,युवा शायर इम्रान राशिद यांनी देखील श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत कार्यक्रमाला एक वेगळी उंची प्रदान केली या वर्धापन सोहळ्याचे अजून एक वेगळे वैशिष्ट म्हणजे विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला यात शहरातील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ राधेश्याम जाजू, डॉ मनोज कुमार मुंडे ( कृष्णा हॉस्पिटल बीड ) डॉ संतोष नामदेवराव शिंदे ( लाईफ लाईन हॉस्पिटल बीड) डॉ राजेंद्र मुंडे ( रेणू हॉस्पिटल बीड ) डॉ नाजिया ईझहार जावेद ( अपेक्स हॉस्पिटल बीड ) यांचा विशेष सन्मान करत त्यांना आमदार इद्रिस नायकवाडी, समीर काझी , व सर्व सन्माननीय मंच यांच्या हस्ते देण्यात आले संध्याकाळी पाच वाजता सुरू झालेले कार्यक्रम रात्री एक वाजेपर्यंत अतिशय चोख अश्या नियोजनात संपन्न झाले या कार्यक्रमात दिव्य वार्ता आणि कशमकश परिवाराला शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची शेवट पर्यंत असलेली उपस्थिती लक्षणीय होती तसेच या वर्धापन दीन सोहळ्याचे अजून एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे समजातील निराधार आणि गरजू महिलांना आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहता यावे म्हणून दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी शिलाई मशिन वाटप आणि गरजू गुणवंत विद्यार्थ्यांना सायकल वाटप देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले एकंदरीतच सामाजिक ,सांस्कृतिक ,मिश्रित असा हा वर्धापन सोहळा होता यात सामाजिक संदेश सांस्कृतीक मेजवानी आणि समजासाठी कार्य करणाऱ्या लोकांचा सन्मान ,गरजू महिलांना विद्यार्थांना मदत असे एक ना अनेक कार्य साध्य करता आले या वर्धापन सोहळ्याला आमदार ईद्रिस नाईकवाडी ,वक्फ बोर्ड महामंडळाचे अध्यक्ष समीर काझी ,पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानुरकर,माजी आमदार सिरजुद्दीन देशमुख ,माजी आमदार राजेंद्र जगताप,संपादक विजयराज बंब,ज्येष्ट नेते मोईन मास्टर,जावेद भैय्या कुरेशी, एम आय एम चे जिल्हाध्यक्ष शेख शफीक ,माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल,नसीम भाई इनामदार,सय्यद शाकेर अहमद,समंदर खान साहेब ,जेडी शहा इनामदार, जहिर कादरी,चंदन पठाण ,इकबाल बॉस , सबिहा खान मॅडम , मोमीन सलाम सेठ,अतुल संघांनी,यशराज पंडित,सलीम जहांगीर ,संपादक काझी मकदुम,खुर्शीद आलंम, बरकत पठाण ,अमोल पौळ, हाजी नजीर साहेब, हाजी इसहाक , हाफिज शाकीर,हाजी मझहरोद्दिन,शेख कलीम, सादेक जमा,माजेद कुरेशी, हाशम बागवान,शेख सादेख,शेख अझहर,अखिल शेख,मोमीन सऊद,समीर तांबोळी, रशीद शिकलगार,सय्यद फेरोज अली, साजन चौधरी,इम्रान जागीरदार, एजाज उर्फ खन्ना भाई, हसीन अखतर ,यांच्या सह जिल्ह्यातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी पुरस्कार निवड समितीचे मुजतबा अहमद खान ,नगरसेवक जैतूल्लाह खान ,अब्दुल गणी बागवान,मोहम्मद इलियास टेलर,आसिफ सवार,अमीन सवार,इरफान सेठ कुरेशी,रफिक बागवान ,खुर्शीद बागवान ,सय्यद नदीम ,समीर सरकार , काशिफ चाऊस,मोहम्मद कैफ ,शेख फिरोज,पठाण सिराज खान ,सय्यद अलीम मणियार,यांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे संचालन गुलाम साकिब,इब्राहिम बक्ष यांनी केले

## सामाजिक भान जपत सांस्कृतिक दृष्ट्या प्रगल्भ असा वेगळा वर्धापन–मोहम्मद अबूबकर

त्यांना रोजगार निर्मितीचा मार्ग निर्माण व्हावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवला पत्रकारिता करता असताना आपण समाजाचे काही देणे लागतो हा विचार नेहमी डोक्यात येत असतो त्याच विचारला कृतीची जोड देत गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शाळेला जाण्यासाठी सायकल देत असतो हा उपक्रम करताना चौदा वर्ष कशी संपली कळलेच नाही त्याच बरोबर समाजातील लोकांचे दुःख आपलेच समजून त्या साठी कार्य करणाऱ्या लोकांचा ही सन्मान आपल्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने करता यावे या साठीच दिवस रात्र मेहनत घेत लोकांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते ,डॉक्टर ,वकील ,शिक्षक ,पत्रकार यांचा सन्मान पुरस्कार देवून आपण करत आलेलो आहोत है शक्य झाले सर्व ते वाचक जाहिरातदार आणि दैनिक दिव्यवार्ता साप्ताहिक कशमकश परिवारवर प्रेम करणाऱ्या उपस्थित असंख्य मान्यवरांच्या सहकार्याने शक्य झाले ते असेच कायम राहावे या साठी प्रयत्नशिल राहू आपल्या विश्वासाला तडा जाणार नाही या साठीच पुढे कार्य करू होईल तेवढे विधायक आणि सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य करण्याचा प्रयत्न नेहमीच करू असे कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा देणाऱ्या अमूल्य वेळ देणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार आपले प्रेम आणि विश्वास कायम असेच राहील असा विश्वास करतो आभार व्यक्त करतो....